# काय म्हणते परिस्थिती, कोण निघते!

## जिल्हाभरात लावले जात आहे 8 उमेदवारांच्या विजयाचे गणित! | उमेदवारांमध्ये मात्र धाकधुक



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.21 )** - विधानसभा निवडणूकीकरिता बुधवारी (दि.20)रोजी मतदानप्रक्रीया पार पडली. मतमोजणी अवघे काही तास बाकी असताना जिल्हाभरातील नागरिक एकमेकांना भ्रमणध्वनीवर संपर्क करुन काय म्हणते तिकडची परिस्थिती, कोण निघते! अशी विचारणा करित आहेत. जिल्हाभरात 8 उमेदवारांच्या विजयाचे गणित लावल्या जात आहे. मात्र निकाला ला घेवून उमेदवारांमध्ये धाकधुक दिसत आहे.

आठ पैकी दोन मतदारसंघात अपक्ष आणि इतर पक्षांनी आपला प्रभाव दाखविला असल्याचे दिसून आले आहे.

निकालात आठ मतदारसंघापैकी महायुती आणि महाविकास आघाडी किती जागा राखते, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. प्रत्येकी दोन मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडी निकालात पुढे आहे. जिल्ह्यातील तिवसा, अचलपूर, बडनेरा आणि अमरावती या चार ठिकाणी दिग्गज उमेदवारांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. दर्यापूर आणि धामणगाव रेल्वे मतदारसंघात महायुतीविरुद्ध महाविकास आघाडी अशी थेट लढत आहे. मोर्शी मतदारसंघातील मैत्रीपूर्ण लढतीत कोण बाजी मारते, मेळघाटात 'कमळ' फुलणार असल्याचे स्पष्ट संकेत आहे.

### माचीस कुणाचे राजकारण पेटविणार

अमरावती मतदारसंघात यंदा बहुरंगी लढत पाहायला मिळाली. काँग्रेसकचे डॉ.सुनील देशमुख, राष्ट्रवादी अजीत पवार गटाच्या सुलभा खोडके, अपक्ष जगदीश गुप्ता, आझाद समाज पक्षाचे अलीम पटेल यांच्यात चुरशीची लढत झाली. माजी मंत्री जगदीश गुप्ता यांनी बंडखोरी करित महायुती घरचा आहेर दिला. त्यांना 'माचीस' हे चिन्ह मिळाले. याव्यतिरिक्त मनसेचे तरुण उमेदवार पप्पू पाटील यांनीही निवडणूकीमध्ये आपली पुर्ण ताकद लावली. पश्चिम अमरावतीमध्ये अलिम पटेल यांचा प्रभाव राहीला. अल्पसंख्यांक आणि हिंदुत्ववादी मतांचे विभाजन हे स्पष्ट आहे, असे असताना जगदीश गुप्तांची माचीस कुणाच्या राजकारणाची राखरांगोळी करणार हे अवघ्या काही तासात स्पष्ट होईल.

### मोर्शीतील महायुतीपैकी एक

गेल्या वेळेस अपक्षाकडे असलेला मोर्शी विधानसभा मतदारसंघ यावेळेस कोणाला संधी देतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. विशेष म्हणजे मोर्शी विधानसभा मतदारसंघात यावेळेस महायुतीमध्ये मैत्रीपूर्ण लढत आहे. येथून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे देवेंद्र भुयार तर भाजपकडून उमेश यावलकर रिंगणात आहे. महाविकास आघाडीने या दोन्ही उमेदवारांच्या विरोधात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे गिरीश कराळे यांना रिंगणात उतरविले. यासह विक्रम ठाकरे यांची अपक्ष उमेदवारी मतदारांवर किती प्रभाव पाडते,हे पाहणे महत्वपूर्ण ठरणार आहे.

### मेळघाटात 'कमळ' उगविण्याचे संकेत

आदिवासी बहुल आणि अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या मेळघाट मतदार संघात भाजपकडून केवलराम काळे, काँग्रेसकडून डॉ.हेमंत चिमोटे तर प्रहार कडून विद्यमान आमदार राजकुमार पटेल यांच्यात काट्याची लढत आहे. दरवेळेस हा मतदारसंघ नव्या उमेदवाराला संधी देऊन आश्चर्यकारक निकाल देण्यासाठी ओळखला जातो. यंदा मेळघाट विधानसभेत विक्रमी 73 टक्क्याच्या वर मतदान झाले आहे.मेळघाटात कमळ उगविण्याचे संकेत दिसत आहे

### बडनेरामध्ये 'ऑटो' की, 'पाना'

कायम चर्चेत राहणाऱ्या बडनेरा मतदारसंघात सलग तीन वेळा आमदारकी कायम राखणारे रवी राणा पुन्हा एकदा महायुतीकडून युवा स्वाभिमान पक्षाच्या तिकिटावर रिंगणात होते. राणांना सुरुवातीला निवडणूक सोपी दिसत असताना प्रिती बंड यांच्या अपक्ष उमेदवारीने राणांचे सिंहासन हलविले. राणांचे बोधचिन्ह पाना आणि बंड यांचे बोधचिन्ह 'ऑटो' यातच लढत पहायला मिळाली. महाविकास आघाडीकडून शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष सुनील खराटे, भाजपमध्ये बंडखोरी करत तुषार भारतीय यांना किती मिळतील यावर पुढील गणित ठरेल.

### दर्यापूरात 'पाना' विरुध्द 'मशाल'

अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या दर्यापूर मतदारसंघात पहिल्यांदाच दोन सेना आमने-सामने लढतीत होत्या.येथून महायुतीत शिवसेना शिंदे गटाकडून कॅप्टन अभिजीत अडसूळ तर महाविकास आघाडीत शिवसेना ठाकरे गटाचे गजानन लेवटे रिंगणात आहे.तर भाजपमधून बंडखोरी करत रमेश बुंदिले यांनी युवा स्वाभिमान पक्षाच्या तिकिटावर येथून उमेदवारी दाखल केल्यामुळे लढत तिरंगी झाली आहे.या तिरंगी लढतीत कोण बाजी मारते याकडे लक्ष लागले आहे.

### अचलपूरमध्ये बच्चु कडूंची च हवा

बच्चू कडू यांचा मतदारसंघ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अचलपुरात यंदा पहिल्यांदाच भाजपचे प्रवीण तायडे या तरुण उमेदवाराला तिकीट दिली. तर महाविकास आघाडी कडून काँग्रेसने येथे नेहमीप्रमाणे बबलू देशमुख यांना रिंगणात उतरविले. येथे बच्चू कडू विरूध्द महाविकास आघाडी आणि महायुती अशी लढत होती. तिघांमध्ये झालेल्या लढतीत अंतिम कोण बाजी मारतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.मात्र या मतदारसंघात बच्चु कडू यांनी पुन्हा प्रहारच्या तिकिटावर जोरदार बॅटींग केल्याची चर्चा आहे.

### धामणगावमध्ये काँग्रेस पुन्हा येणार का?

गेल्या 2019 च्या विधानसभा निवडणुकीत भाजपचा गड असलेला धामणगाव रेल्वे मतदार संघ यावेळेस प्रताप अडसळ कायम राखतात का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. प्रताप अडसड यांच्या व्यतिरिक्त या मतदारसंघात काँग्रेसकडून माजी आमदार वीरेंद्र जगताप,वंचित बहुजन आघाडीचे युवा प्रदेशाध्यक्ष निलेश विश्वकर्मा हे रिंगणात आहेत.या मतदारसंघात तिरंगी लढत असून भाजपसाठी हा मतदार संघ प्रतिष्ठेचा आहे.जिल्ह्यात राहुल गांधींची येथेच एकमेव सभा झाल्यामुळे निकालाकडे सर्वांचे विशेष लक्ष आहे.

### तिवसात कॉंग्रेस-भाजपमध्ये काट्याची लढत

तिवसा मतदार संघात काँग्रेसच्या दिग्गज नेत्या यशोमती ठाकूर आणि भाजपचे राजेश वानखडे यांच्यात काट्याची लढत होत आहे. सलग मतदार संघाचे नेतृत्व करणाऱ्या यशोमती ठाकूर यावेळेस गड राखतात का, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. मागील निवडणुकीत त्यांचा केवळ दहा हजार मतांनी विजय झाला होता.त्यामुळे यावेळेस तिवसा मतदारसंघात विजयाची माळ कुणाच्या गळ्यात पडते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दुचाकी घसरून झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू

## एक जण जखमी

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.21 )** - दुचाकी घसरून झालेल्या अपघातात एका 64 वर्षीय इसमाचा जागीच मृत्यू झाला असून दुसऱ्याचा मोर्शीतील उपजिल्हा रुग्णालयाच उपचार सुरु आहे. इसराइल बेग उस्मान बेग (वय 64 वर्ष) असे मृताचे नाव आहे. या अपघातात यासीम शेख तसलीम (47 वर्ष रा.खेड) हे जखमी झाले आहेत. ही घटना 21 नोव्हेंबर रोजी दुपारी 1 वाजताचे सुमारास घडली.

पोलीस सूत्रांनुसार, मोर्शी तालुक्यातील खेड येथील इसराइल बेग उस्मान बेग (वय 64 वर्ष) हे खेड गावापासून काही अंतरावर असलेल्या लक्कडशहा बाबा यांचे दर्ग्यावर दर्शनासाठी गेला होते. दर्शन घेऊन परत येत असतांना इसराइल बेग हा शेख यासीम शेख तसलीम (47 वर्ष रा.खेड) यांच्या दुचाकी क्रमांक एम एस 27 बीसी 63 60 वर बसून निघाले होते. दरम्यान मात्र खेड ते सायवाडा रोडवर त्यांची दुचाकी घसरून अपघात झाला. या अपघातात दोघेही रस्त्यावर कोसळले. त्यामुळे गंभीर जखमी झाले. या अपघातानंतर काही नागरिकांच्या मदतीने खेड येथील रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर त्यानंतर इसराईल बेग व शेख तसलिम या दोघांनाही उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. त्यावेळी इसराईल बेगला मृत घोषीत करण्यात आले. दुचाकीचालक शेख यासीन शेख तसलीम यांचेवर उपजिल्हा रुग्णालय येथे उपचार सुरू आहे. या घटनेची माहिती मोर्शी पोलिसांना प्राप्त होताच पोलीस उपनिरीक्षक अमोल बुरकुल यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला व पुढील तपास आरंभीला आहे.

# त्या मतपेट्या सुरक्षितच

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.21 )**- येथील गोपाल नगर स्थित राजीव गांधी महाविद्यालयातील मतदान केंद्रावरील मतपेट्या दुचाकीवर नेल्याच्या कारणाहून उठलेले वादंग रात्री 3 वा. शमले. निवडणूक अधिकाऱ्यांनी उमेदवार प्रिती बंड यांना श्री शिवाजी बिपीएड महाविद्यालयात त्या सर्व मतपेट्या सुरक्षित असल्याचे समाधान केल्यावर वाद मिटला. मात्र दुचाकीवर मतपेट्या आणल्याप्रकरणी जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यावर कारवाईची टांगती तलवार असल्याचे दिसत आहे.

# लग्नाचा आग्रह धरून तरुणीला आत्महत्येची धमकी

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 21 )** - मैत्रिपूर्ण संबंधातून एका तरुणीला लग्नासाठी आग्रह केला. परंतू तिने नकार दिल्यामुळे तरुणाने तिला आत्महत्या करण्याची धमकी दिली. या घटनेची तक्रार पिडित तरुणीने 21 नोव्हेबर रोजी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी तेजस प्रविण फाटे (23, रा. चांदुरबाजार) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. पिडित तरुणीच्या तक्रारीनुसार, तीचे आरोपी तेजससोबत दोन वर्षांपासून मैत्रिपूर्ण संबंध होते. ती मैत्रीच्या नात्याने त्याच्याशी बोलत होती. दरम्यान तेजसने तरुणीला लग्नासाठी प्रपोज केला. परंतू तीने नकार दिला. त्यानंतर तरुणीने तेजससोबत संबंध तोडले. परंतू तरीही तेजसने तरुणीला बाहेर बोलावून, तिला शिविगाळ केली. तु माझ्याशी लग्न केले नाही, तर मी आत्महत्या करेन, अशी धमकी तेजसने तरुणीला दिली. त्यामुळे तरुणीने फ्रेजरपुरा पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली.

# पारा घसरला, थंडीचा वाढला प्रभाव

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.21 )** - यंदा थंडीचा जोर उशिराचा सुरु झाला आहे. दिवाळीपूर्वीची थंडीचा प्रभाव दरवर्षी वाढते. परंतू यंदा दिवाळी आटोपल्यानंतर नोव्हेबर महिना अर्धाअधिक उलटून गेला आहे. परंतू अजुनही गुलाबी थंडी सुरु झालेली नाही. परंतू 21 नोव्हेबर रोजीची 15.2 डीग्री सेल्सीअस तापमानाची नोंद झाली असून, थंडीचा जोर वाढलेला आहे. त्यामुळे थंडीच्या बचावासाठी ऊबदार कपड्यांचा वापर वाढलेला आहे.



**तापमान 15.2 डीग्रीवर, शेकोट्या पेटल्या**

दरवर्षी दिवाळीपूर्वीच थंडी सुरु होते. परंतू यंदा थंडी उशिरा सुरु झाली आहे. त्यामुळे आतापर्यंत ऊबदार कपड्याची आवश्यकता वाटली नाही. परंतू आता गेल्या तीन दिवसांपासून थंडीचा प्रभाव हळूहळु वाढू लागला आहे. त्यामुळे स्वेटर, जर्किन, मफलर, टोप्या अशा आदी ऊबदार कपड्यांचा वापर वाढल्याचे दिसून येत आहे. परंतू अद्यापही गुलाबी थंडीला सुरुवात झाली नाही. शहरात थंडीचा प्रभाव फारसा जाणवत नाही. त्यामुळे अद्याप शहर परिसरात शेकोट्या पेटल्या नाहीत. परंतू ग्रामिण भाग विरळ असल्याने तसेच शेतीमुळे थंडीचा प्रभाव अधिक जाणवत आहे. त्यामुळे ग्रामिण भागात शेकोट्या पेटण्यास सुरुवात झाली आहे. थंडीमुळे आता नागरिकांच्या दिनचर्येत बदला झाला आहे. अमरावतीकरांची सकाळ आता उशिरा होत असून, रात्री लवकरच नागरिक घरात शिरत आहे. अशातच पाणी थंड असल्यामुळे गरम पाण्याचा वापर वाढलेला आहे.

# 30 तासानंतर झोपले अधिकारी, कर्मचारी

- पहाटेपर्यंत चालली ईव्हीएम सुरक्षित करण्याची प्रक्रीया
- मेळघाटमधील कर्मचाऱ्यांचा सर्वाधिक वेळ प्रवासात खर्ची

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.21 )** - मतदानाच्या दिवशी बुधवारी(20 नोव्हेंबर) मतदान वेळेवर सकाळी 7 वाजता सुरु करण्याकरिता पहाटेपासून उठलेले कर्मचारी दुसऱ्या दिवशी थेट 30 तासानंतर झोपले. ईव्हीएम सुरक्षित पोहचवून संपुर्ण कागदोपत्री कारवाई पुर्ण करण्याकरिता अनेक मतदारासंघात या अधिकारी, कर्मचाऱ्यांना पहाट उगवली. मेळघाटात मतदान प्रक्रीयेत असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सर्वाधिक वेळ प्रवासात गेला. पथ्रोट, अंबापाटी, धामणगाव गढी, कांडलीतील काही भाग मेळघाट मतदारसंघात येत असल्याने हे कर्मचारी मुख्यालय धारणीतून या ठिकाणी आले होते, त्यानंतर पुन्हा धारणीत गेले. घाटवळणाचे रस्ते व यातील अधिकतर भाग दुर्गम असल्याने 3 ते 4 तास या कर्मचाऱ्यांना प्रवास करावा लागला. अमरावती व बडनेरा मतदारसंघातील सर्व मतदान केंद्रातील ईव्हीएम मशीन उमेदवारांच्या प्रतिनिधींसमोर सील करून आवश्यक कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करून सर्व ईव्हीएम मशीन लोकशाही भवनात बनविलेल्या दोन स्वतंत्र स्ट्राँग रूममध्ये पोहोचविण्याचे काम पहाटे 5.30 वाजेपर्यंत सुरु होते. ईव्हीएम जमा करण्याकरिता अमरावती मतदारसंघासाठी जिल्हा प्रशासनाने मुख्यालय लोकशाही भवन येथे आणि शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय म्हणजेच शिवाजी बी.पी.एड महाविद्यालय बडनेरा मतदारसंघासाठी निश्चित केले होते. सर्व कागदोपत्री प्रक्रीया पुर्ण झाल्यावर बडनेरा मतदारसंघातील ईव्हीएमही बिपीएड महाविद्यालयातून लोकशाही भवनात पाठविण्यात आल्या. रात्रीचे 2 वाजता सर्व ईव्हीएम जमा करण्याचे काम सुरु होते आणि ईव्हीएम मशीन शिवाजी बी.पी.एड कॉलेज ते लोकशाही भवनापर्यंत नेण्याचे व स्ट्राँग रूममध्ये ठेवून सील करण्याचे काम पूर्ण झाले, तोपर्यंत 5.50 वाजले होते. सकाळी या संपूर्ण प्रक्रियेवर निवडणूक निरीक्षक श्याम पुनिया यांनी लक्ष ठेवले होते. या वेळी अमरावती मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अनिल भटकर व सहायक निवडणूक अधिकारी विजय लोखंडे व बडनेरा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विवेक जाधव व सहायक निवडणूक अधिकारी अजित येवले तसेच दोन्ही मतदारसंघातील उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



### मतमोजणीकरिता सुसज्ज केले लोकशाही भवन

मतदान प्रक्रिया पूर्ण होताच अमरावती विभागाच्या वतीने विद्यापिठ मार्गावरील लोकशाही भवन येथे निवडणूक विभागातर्फे मतदारसंघातील मतमोजणीसाठी आवश्यक ती सर्व तयारी सुरू करण्यात आली आहे. अमरावती आणि बडनेरा मतदारसंघातील मतदानाची मोजणी 23 नोव्हेंबर रोजी सकाळी 8 वाजल्यापासून दोन स्वतंत्र सभागृहात होणार आहे. यासाठी दोन्ही मतदारसंघांसाठी प्रत्येकी 14 टेबल लावण्यात येणार असून प्रत्येक टेबलवर एक पोलीस कर्मचारी आणि 3 मतमोजणी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. याशिवाय लोकशाही भवन संकुलात मोबाईल टॉयलेट, फायर ब्रिगेड, जनरेटरची व्यवस्था करण्याबरोबरच या संकुलात भव्य पंडालही उभारण्यात आला आहे. यासोबतच आज जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी मतमोजणीसाठी नियुक्त केलेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शन व प्रशिक्षण सत्राला संबोधित करताना सर्व मतमोजणी कर्मचाऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन करताना मतमोजणी प्रभावी करण्याबाबत काही महत्वाच्या सूचना दिल्या.

# मतमोजणी : अमरावती, बडनेराकरिता चालतील 25 फेऱ्या



**प्रत्येकी 14 टेबलांवर मतमोजणीची व्यवस्था**

| मतदारसंघ | एकुण केंद्र | ईव्हीएम | पोस्टल | ईटीपीबीएस | राऊंड |
|---|---|---|---|---|---|
| धामणगांव रेल्वे | 378 | 14 | 06 | 02 | 27 |
| बडनेरा | 348 | 14 | 08 | 04 | 25 |
| अमरावती | 345 | 14 | 10 | 01 | 25 |
| तिवसा | 319 | 14 | 05 | 02 | 23 |
| दर्यापुर | 342 | 14 | 06 | 05 | 25 |
| मेळघाट | 356 | 14 | 04 | 21 | 26 |
| अचलपुर | 309 | 14 | 05 | 02 | 23 |
| मोर्शी | 311 | 14 | 07 | 03 | 23 |
| एकुण | 2708 | 112 | 51 | 20 | -- |

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.21 )**- संपुर्ण जिल्ह्याला उत्सुकता लागलेल्या मतदानाचा निर्णय उद्या, शनिवार, 23 नोव्हेंबर रोजी हाती येईल. अमरावती आणि बडनेरा मतदारसंघाच्या मतमोजणीकरिता सकाळी 8 वाजता येथील विद्यापीठ मार्गावरील लोकशाही भवन येथे प्रत्यक्ष मतमोजणीला सुरुवात होणार आहे. अमरावती आणि बडनेरा विधानसभेची प्रत्येकी 14 टेबलांवर स्वतंत्र मतमोजणी करण्याची व्यवस्था निवडणूक आयोगाने केली आहे. याशिवाय पोस्टल आणि ईटीबीपीएस मतांच्या मोजणीसाठी स्वतंत्र टेबल असतील. अशी माहिती सुत्रांकडून मिळत आहे. जिल्ह्यातील आठही ठिकाणी चुरसीची लढत झाल्याने दोन्ही उमेदवारांमध्ये विजयाचे अंतर कमी होऊन मतमोजणी हृदयाचे ठोके वाढविणारी होवू शकते. आठही विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीचे निकाल दुपारी 3 वाजेपर्यंत लागण्याची शक्यता आहे.

प्रत्येक टेबलावर केंद्र सरकारचे अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आल्याचे निवडणूक आयोगाच्या वतीने सांगण्यात आले.

त्याच प्रमाणे मतमोजणीसाठी एक मतमोजणी अधिकारी, त्यांचे सहाय्यक आणि एक सूक्ष्म निरीक्षक असणार आहेत, अशी माहिती देताना सर्वसाधारण टपाल मतपत्रिकेच्या मतमोजणीसाठी बडनेरा विधानसभा मतदारसंघात 8 आणि 8 अमरावती विधानसभा मतदारसंघात 10 टेबल असतील. तसेच ईटीपीबीएसच्या मतांसाठी बडनेरा मतदारसंघात 4 टेबल आणि अमरावती मतदारसंघात 1 टेबलची व्यवस्था असेल. धामणगाव रेल्वे विधानसभेसाठी जास्तीत जास्त 27 फेऱ्या होण्याची शक्यता आहे. जिल्हा निवडणूक विभागाने सर्व अधिकाऱ्यांना कळविले आहे. लोकशाही भवनात कडेकोट बंदोबस्तात कोणत्या बाबींची काळजी घेणे आवश्यक आहे, याचीही माहिती देण्यात आली. बुधवार 20 नोव्हेंबर रोजी मतदान झाल्यानंतर अमरावती आणि बडनेरा विधानसभा मतदारसंघातील सर्व ईव्हीएम मशीन कडेकोट बंदोबस्तात लोकशाही भवनात आणण्यात आल्या. गुरुवारी सकाळपर्यंत ही प्रक्रिया सुरू होती.

त्यानंतर निवडणूक निरीक्षकांच्या उपस्थितीत स्ट्राँग रूममध्ये ईव्हीएम सील करण्यात आले. आता स्ट्राँग रूमच्या भोवती सीआरपीएफचे जवान कडेकोट पहारा देत आहेत. याशिवाय सीसीटीव्ही कॅमेरेही बसविण्यात आले आहेत. विद्यापीठ मार्गापासून लोकशाही भवनाच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर बॅरिकेटींग करून शहर पोलिसांना तैनात करण्यात आले आहेत.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# भुयार 'पुन्हा येईल' की, यावलकरांचा 'नवा गडी नवा राज'!

## मोर्शी मतदार संघात कोण मारणार बाजी ?






**विलास पाटील**

**वरुड,( दि.21 )** - वरुड, मोर्शी विधानसभा मतदार संघाची निवडणूक नुकतीच पार पडली असून आता तर्कवितर्क लावणे सुरु झाले आहे. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे आमदार देवेंद्र भुयार यांची 'घड्याळ', भारतीय जनता पार्टीचे चंदू यावलकर यांचे 'कमळ', महाविकास आघाडीचे गिरीश कराळे यांची 'तुतारी' तर अपक्ष उमेदवार विक्रम ठाकरे यांचा 'लिफाफा' अशी चौरंगी लढत होती. सुरुवातीला देवेंद्र भुयार हे मागे राहणार असे वातावरण होते,तर कमळ, लिफाफा व तुतारी हे आघाडीवर होते. मात्र प्रचाराचा ज्वर चढत असताना घड्याळ व कमळ या दोघांमध्येच निकराची लढत पहायला मिळाली.

लोकसभा निवडणूकी पासुनच विक्रम ठाकरे यांनी विधानसभा लढण्याच्या तयारीला सुरवात केली असल्याने त्यांचा प्रचार हा सुरुवातीपासूनच दमदार होता. परंतू ते नंतर प्रचारात मागे पडले. त्यांच्या प्रचाराचे नियोजन कोलमडल्याचे पहायला मिळाले. मतदानाच्या शेवटच्या दिवसापर्यंत त्यांचा प्रभाव राहला नाही. नेत्यांच्या सभा, रोड शो झाल्याने कमळ व घड्याळाने प्रचारात आघाडी घेतल्याचे दिसून आले. कमळ आणि घड्याळमध्ये झालेल्या लढतीत कोण बाजी मारणार? हे याची उत्सुकता मतदारांना लागली आहे. सुरुवातीपासूनच वरुड-मोर्शी विधानसभा मतदार संघात महायुतीची उमेदवारी विद्यमान आमदार देवेंद्र भुयार यांना जाणार अशी चर्चा असताना भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी पक्षाकडे तगादा लावून ही उमेदवारी चंदू उर्फ उमेश यावलकर यांच्यासाठी खेचून आणली. त्यामुळे या मतदारसंघात या दोघांमध्ये मैत्रीपूर्ण लढत झाली. काँग्रेस मध्येही तीच परिस्थिती झाली व महाविकास आघाडीची उमेदवारी गिरीश कराळे यांना मिळाली व अपक्ष म्हणून विक्रम ठाकरे यांना उभे रहावे लागले. त्यामुळे या मतदारसंघात चौरंगी लढत होणार हे निश्चित झाले असताना शेवटच्या दिवशी मात्र दोघांमध्येच काट्याची टक्कर झाली.

मतदार आता बोलू लागले आहे. देवेंद्र भुयार हे पाच वर्ष या भागाचे आमदार राहिल्याने त्यांनी या मतदार संघासाठी 4372 कोटी रुपये आणले, त्यांनी आपल्या कामाचे प्रदर्शन प्रचारादरम्यान सर्व मतदारांपर्यंत पोहचविले. त्यांच्या कार्यकर्त्यांनीसुद्धा मतदारांना विकासावरच मते मागितले. दुसरीकडे वरुड-मोर्शी मतदारसंघ हा भाजपचा गड आहे, हे लोकसभेमध्ये सिध्द झाले. त्यात बहुल समाज असलेल्या माळी समाजाला नेतृत्वाची संधी दिल्याने लढत निकराची झाली. अन्य दोन उमेदवारही कोठेच कमी नव्हते. या चौरंगी लढतीतील कुणाची लॉटरी लागणार याकडे मात्र मतदारांचे लक्ष लागलेले आहे. एकूण चार बलाढ्य उमेदवार या शर्यतीत आहे. त्यामुळे कोण बाजी मारणार हे सांगणे सध्या तरी कठीण असले तरी मात्र निकालानंतर स्पष्ट होईलच.

# लोकशाही भवनाकडे जाणाऱ्या मार्गावर नो-एन्ट्री

## 23 नोव्हेबर रोजी मतमोजणीसाठी अधिसुचना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.21 )** - बडनेरा व अमरावती विधानसभा मतदार संघाची मतमोजणी 23 नोव्हेंबर रोजी मार्डी रोडवरील लोकशाही भवनात सकाळी 8 वाजतापासुन सुरु होणार आहे. मतमोजणी प्रक्रीया सुरु असतांना लोकशाही भवन परिसरात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मतमोजणी स्थळाकडे जाणार्या मार्गामध्ये बदल करण्यात आला आहे.

लोकशाही भवन असलेल्या बियाणी चौक ते विद्यापीठ चौक या मार्गाचे कॉक्रीटीकरणाचे काम अपूर्ण आहे. मतमोजणी प्रक्रीया दरम्यान येणाऱ्या वाहनांमुळे सदर मार्गावर वाहतुकीची कोंडी, अपघातासारखी अप्रिय घटना/इतर अनुचित प्रकार घडुन सार्वजनिक शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सर्वसामान्य जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातुन खबरदारीची उपाययोजना म्हणुन 23 नोव्हेबर रोजी सकाळी 6 वाजतापासुन जनहितार्थ मतमोजणी प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत बियाणी चौक ते विद्यापीठ चौक या मार्गावरिल सर्व प्रकारची वाहतुक बंद करुन इतर मार्गाने वळविण्यात येणार असल्याची अधिसुचना पोलिस उपायुक्त कल्पना बारवकर यांनी पारित केली आहे. सदर आदेश/अधिसुचनेचे जो कोणी वाहनचालक पालन करणार नाही, त्यांच्याविरुध्द मोटार वाहन कायदा 1988 व महाराष्ट्र पोलीस कायदा 1951 अन्वये कायदेशीर कार्यवाही



करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी. पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर व वाहतुक विभाग, अमरावती शहराकडुन सर्व नागरिकांना याव्दारे जाहीर आवाहन करण्यात येते की, आदेशात नमुद निर्बंधाचे सर्व वाहन चालकांनी काटेकोरपणे पालन करुन पोलीस विभागास आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मतमोजणीवेळी या मार्गावरील सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी राहणार असून त्यांना पर्यायी मार्गाचा वापर करावा लागणार आहे.

बियाणी चौक ते तपोवन गेटपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनास प्रवेश बंदी करण्यात आली आहे. तर पर्यायी मार्ग म्हणून मार्डी मार्गे येणार तसेच तपोवन गेट परिसरातील निवासी वसाहतील वाहन चालकांना अमरावती शहरात येण्याकरीता पर्यायी मार्ग विद्यापीठ चौक रचना सृष्टी विक्रांत लॉन, दंत महाविद्यालय, वडाळी ओवरब्रिज चौक, अंधविद्यालय चपराशीपुरा या मार्गाचा वापर करावा लागेल.

# मोर्शी विधानसभेत 71.66 टक्के मतदान



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.21 )** - मोर्शी- वरूड विधानसभा क्षेत्रात एकूण 311 मतदान केंद्रावर शांततेत मतदान पार पडले. 19 उमेदवार निवडणुक रिंगणात होते, तर प्रमुख चार उमेदवारांमध्ये काट्याच्या लढतीत कोण होणार आमदार याबाबत मतदारांमध्ये आतुरता लागली आहे. मोर्शी विधानसभा मतदारसंघात 71.66 टक्के मतदान झाले.

सकाळी सात वाजता पासून सुरू झालेल्या मतदान प्रक्रियेत दुपारी बारा वाजेपर्यंत जास्तीत जास्त पुरुष मतदारांनी भाग घेतला. दुपारी बारानंतर घरची कामे आटोपून महिला मतदारांनी गर्दी केली. दुपारी तीन साडेतीन वाजल्यानंतर शेती वरची कामे आटपून आलेल्या ग्रामीण भागात शेतमजुरांनी गर्दी केली. त्यामुळे शेवटच्या दोन अडीच तासात मतदारांची गर्दी आढळून आली. मतदार जागृती अभियानाचा सकारात्मक प्रभाव काही गावातील मतदानाच्या टक्केवारीवरून आढळून आला. मोर्शी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या 91 मतदान केंद्रावर दिवसभर शांततेत मतदान पार पडले. कोणताही अनुचित प्रकार घडला नसल्याचे मोर्शी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी सांगितले.

# जनजागृतीवर कोट्यवधीचा खर्च मात्र पाच वर्षात 6 टक्के वाढ

## मतदानाच्या टक्केवारीत लक्षणीय वाढ कधी ?

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.21 )** - विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी बुधवार, दि. 20 नोव्हेंबर रोजी उत्साहात मतदान पार पडले. या निवडणुकीच्या निमित्ताने जिल्ह्याच्या इतिहासातील सर्वाधिक मतदानाची टक्केवारी नोंदविली गेली आहे. तसेच गेल्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत सुमारे 6 टक्के मतदानाची टक्केवारी वाढली आहे. मात्र जनजागृतीवर ज्या पध्दतीने कोट्यवधी रुपयांचा खर्च होतो, त्या तुलनेत ही वाढ लक्षणीय



नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

गेल्या 2019 च्या विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी 60 एवढी होती. यात विक्रमी 6 टक्यांनी वाढ होत यावर्षी 66.40 टक्के मतदान झाले आहे. मतदानाच्या टक्केवारीत ही मोठी वाढ आहे. त्यासोबतच अमरावती जिल्ह्याच्या इतिहासातील ही सर्वाधिक मतदानाची टक्केवारी आहे. मतदानासाठी प्रशासनाने केलेली तयारी, जनजागृती आणि नागरिकांच्या उत्साही सहभागाने मतदानाचा टक्का सुधारला आहे. यावेळी विधानसभा निवडणुकीत कोणतीही तक्रार आलेली नाही. प्रामुख्याने मतदारयादीमध्ये निवडणुकीपूर्वी 1 लाखाहून अधिक नवीन मतदार नोंदणी केली आहे. त्यामुळे मतदारयादीत नाव नसल्याची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. मतदारांनी मतदान प्रक्रियेत उत्साहात सहभाग घेतल्याने जिल्ह्यातील मतदानाच्या टक्केवारीत लक्षणीय वाढ झाली आहे. मतदानात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविल्याबद्दल जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी मतदारांचे आभार मानले आहे.

### 16 लाख 90 हजार 880 मतदारांनी केले मतदान

जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघात 8 लाख 91 हजार 3 पुरूष, 7 लाख 99 हजार 847 महिला आणि तृतीयपंथी 30 अशा एकूण 16 लाख 90 हजार 880 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. जिल्ह्याची एकूण मतदानाची टक्केवारी 66.40 आहे.

### तालुकानिहाय मतदानाची स्थिती

धामणगाव रेल्वे मतदारसंघात 69.75 टक्के मतदान झाले. यात 1 लाख 17 हजार 222 पुरुष आणि 1 लाख 4 हजार 497 महिला, असे एकूण 2 लाख 21 हजार 719 जणांनी मतदानाचा हक्क बजावला. बडनेरा मतदारसंघात 57.67 टक्के मतदान झाले. 1 लाख 8 हजार 465 पुरुष, 1 लाख 1 हजार 329 महिला आणि 15 तृतीयपंथीय असे एकूण 2 लाख 9 हजार 809 जणांनी मतदानाचा हक्क बजावला. अमरावती मतदारसंघात 56.51 टक्के मतदान झाले. यात 1 लाख 10 हजार 997 पुरुष, 1 लाख 599 महिला आणि 10 तृतीयपंथी असे एकूण 2 लाख 11 हजार 606 जणांनी मतदानाचा हक्क बजावला. तिवसा मतदारसंघात 67.93 टक्के मतदान झाले. यात 1 लाख 7 हजार 458 पुरुष, 93 हजार 954 महिला असे एकूण 2 लाख 01 हजार 412 जणांनी मतदानाचा हक्क बजावला. दर्यापूर मतदारसंघात 66.85 टक्के मतदान झाले. यात 1 लाख 10 हजार 688 पुरुष, 95 हजार 500 महिला असे एकूण 2 लाख 6 हजार 188 जणांनी मतदानाचा हक्क बजावला. मेळघाट मतदारसंघात 73.14 टक्के मतदान झाले. यात 1 लाख 14 हजार 523 पुरुष, 1 लाख 6 हजार 386 महिला आणि तृतीयपंथी 4 असे एकूण 2 लाख 20 हजार 913 जणांनी मतदानाचा हक्क बजावला. अचलपूर मतदारसंघात 72.07 टक्के मतदान झाले. यात 1 लाख 12 हजार 131 पुरुष, 98 हजार 482 महिला, तृतीयपंथी 1 असे एकूण 2 लाख 10 हजार 614 जणांनी मतदानाचा हक्क बजावला. मोर्शी मतदारसंघात 71.66 टक्के मतदान झाले. यात 1 लाख 9 हजार 519 पुरुष, 99 हजार 100 महिला असे एकूण 2 लाख 8 हजार 619 जणांनी मतदानाचा हक्क बजावला.

# पोलिसांशी हुज्जत घालून शासकीय कामात अडथळा

## भातकुलीच्या सायत परिसरातील घटना

## चार जणांविरुध्द गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ( दि. 21 )** - पोलिस अधिकारी व कर्मचारी हे विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने 20 नोव्हेबर रोजी मतपेट्या रवाना झाल्या कि नाही, याची पाहणी करीत होते. दरम्यान सायत येथील जिल्हा परिषद शाळेसमोरून एक मारोती ओमनी वाहन भरधाव व निष्काळजीपणाने येत असल्याचे पोलिसांना दिसले. त्यामुळे पोलिसांनी वाहनाला थांबण्याचा इशारा केला. परंतू वाहन थांबले नाही आणि ते पुढे निघून गेले. त्यामुळे पोलिसांनी वाहनाचा पाठलाग केला आणि वाहनाला थांबविले. त्यावेळी वाहन क्रमांक एमएच 30 एल 5322 मधील नागरिकांनी पोलिसांना नाव विचारले. त्यावेळी त्याने अनिल वर्धे असे नाव सांगितले. पोलिसांनी त्याला वाहनाच्या दस्तावेजाची विचारणा केली असता, वाहनातील अन्य लोकांनी पोलिसांनी हुज्जत घालून शाब्दीक वाद केला आणि शासकीय कामात अडथळा केला.

पोलिसांनी वाहन थांबविण्यास सांगितले, परंतू वाहन थांबविले नाही. त्यामुळे पोलिसांनी पाठलाग करून वाहन थांबविले. त्यावेळी वाहनातील नागरिकांनी पोलिसांशी हुज्जतबाजी करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. या घटनेची तक्रार पोलिस हवालदार गौतम दुर्योधन ढोणे यांनी भातकुली पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी अनिल जानराव वर्धे (48), धिरज बाबाराव वर्धे (24), सुरज बाबाराव वर्धे (30) व प्रफुल घनशाम वानखडे (28, सर्व रा. सायत, ता. भातकुली) यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# धामणगाव विधानसभा मतदारसंघ निवडणुकीत 69 टक्के मतदान

## 24 उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएम मध्ये बंद



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.21 )**- धामणगाव विधानसभा मतदारसंघ निवडणुक - 2024 चे मतदान बुधवारी पार पडले. यात 69.75 टक्के मतदान झाल्याची महिती निवडणुक प्रशासनाकडून प्राप्त झाली आहे.

सत्ताधारी महायुती आणि विरोधी पक्ष महाविकास आघाडीसाठी निकराची तितकीच अटीतटीची राजकीय लढाई ठरलेल्या महाराष्ट्राच्या पंधराव्या विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी मतदान झाले. धामणगाव विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 साठी सकाळी 7 वाजल्यापासून मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत सुरु झाली होती. यामध्ये मतदानाची टक्केवारी 69.75 इतकी आहे अशी माहिती मिळाली आहे. यात 1 लाख 17 हजार 222 पुरूष तर 1 लाख 4 हजार 497 महिलांनी असे एकुण 2 लाख 21 हजार 719 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यावेळी मतदारांमध्ये चांगला उत्साह सुध्दा दिसत होता. धामणगाव मतदारसंघात महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे प्रा. वीरेंद्र जगताप, महायुतीकडून भाजपाचे प्रताप अडसड, वंचित बहुजन आघाडीकडून डॉ. निलेश विश्वकर्मा यांसह एकुण 24 उमेदवार रिंगणात आहे. या सर्व उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएम मध्ये बंद झाले आहे.

### राहूल गांधींच्या सभेमुळे मिळाले बळ?

महाविकास आघाडीचे उमेदवार प्रा. वीरेंद्र जगताप यांनी तीन टर्ममध्ये आमदारकी पद भूषविले. यानंतर मागील पंचवार्षिक मध्ये त्यांचा पराभव झाला होता. या पराभवानंतर सुद्धा त्यांनी मतदारांमधला संपर्क कमी होऊ दिला नाही. अशातच या निवडणुकीमध्ये प्रा. वीरेंद्र जगताप यांच्याकरिता धामणगाव येथे झालेली लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांची सभा यामुळे त्यांना बळ मिळाल्याचे बोलल्या जात आहे.

### जागोजागी घेतल्या सभा

वंचित बहुजन आघाडी तर्फे युवा प्रदेशाध्यक्ष डॉ. निलेश विश्वकर्मा यांना उमेदवारी देण्यात आली होती. डॉ. निलेश विश्वकर्मा यांनी सर्वात आधी प्रचार सुरू करत अख्खा मतदारसंघ पिंजून काढला. अशातच त्यांनी गावोगावी सभा घेऊन आपले निवडणुकीतील व्हीजन लोकांसमोर ठेवले. तसेच त्यांच्या प्रचाराकरीता वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांची सभा नांदगाव येथे झाली. यामुळे निलेश विश्वकर्मा यांनी सुद्धा या निवडणुकीत प्रचंड मेहनत घेतल्याचे दिसून आले.

### लाडकी बहिण ठरली प्रभावी ?

महायुती सरकारने निवडणुकी अगोदर लाडकी बहीण योजना लागू केल्यामुळे महिलांना पंधराशे रुपये प्रति महिना दिवाळीपर्यंत मिळाला. तसेच यानंतर 2100 रुपये प्रति महिना करणार असल्याचे आश्वासन महायुतीकडून निवडणुकीदरम्यान देण्यात आले. त्यामुळे या निवडणुकीत महिलांनी मोठ्या प्रमाणात मतदानाचा हक्क बजावला असून महिलांच्या मोठ्या रांगा मतदानाकरिता पहावयास मिळाल्या. याशिवाय महायुतीचे उमेदवार प्रताप अडसड यांच्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान, भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्या सभा झाल्या. याचा सुध्दा फायदा प्रताप अडसड यांना झाल्याचे बोलल्या जात आहे.

# अपक्षांसह पक्षांच्या उमेदवारांचेही डिपॉजीट जप्त होण्याच्या मार्गावर

## 140 उमेदवारांचे डिपॉजीट 'राम भरोसे'?

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.21 )**- जिल्ह्यातील 8 विधानसभा मतदारसंघात एकूण 160 उमेदवार रिंगणात आहेत. डिपॉझिट वाचवण्यासाठी, या उमेदवारांना एकूण वैध मतांपैकी एक षष्ठांश मते आवश्यक आहेत. विजयी आणि दुसऱ्या क्रमांकावरील पराभूत उमेदवार वगळता 140 उमेदवारांचे डिपॉजीट 'राम भरोसे' असल्याचे दिसत आहे. यामध्ये अपक्षांसह पक्षाच्या उमेदवारांचाही समावेश राहील असे चिन्ह दिसत आहे.

निवडणूक प्रचारादरम्यान अनेक उमेदवारांनी त्यांच्या प्रतिस्पर्धांना आव्हान देत त्यांचे डिपॉझिट जप्त होणार असल्याचा दावा केला होता. निवडणूकीचा अर्ज भरताना निवडणूक आयोगाकडे जमा केलेली 10 हजार रुपयांची अनामत रक्कम जप्त करणे हा अपमानजनक पराभव मानला जातो. ज्या उमेदवारांना एकूण मतांपैकी एक षष्ठांश म्हणजेच 16.66 टक्के मते




मिळाली नाहीत, त्यांचे डिपॉझिट जप्त होते. राजकीय समीकरणांचा परिणाम विधानसभा निवडणुकीवर दिसून आला. जिल्ह्यातील 8 विधानसभा मतदारसंघातील निवडणूक प्रचार थांबला आहे. महायुती आणि महाविकास आघाडीचे उमेदवार एकमेकांना तुल्यबळ स्पर्धा देत आहेत. काही ठिकाणी तिरंगी लढत दिसून येत आहे. यावेळी नव्या चेहऱ्यांसह दिग्गज रिंगणात उतरल्याने निवडणुकीचे चित्र बदलले आहे. काही ठिकाणची बंडखोरी फारशी सिद्ध होणार नाही, 8 विधानसभा मतदारसंघात एकूण 160 उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. 23 नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. उमेदवारी न मिळाल्याने नाराज झालेल्या अनेक नेत्यांनी आपापल्या पक्षांविरुद्ध बंडखोरी करून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहे. अनेक प्रकारे प्रचार केला. आता मतदानाबरोबरच जमा झालेल्या मतांची संख्या कळत असल्याने उमेदवाराचे समर्थक विविध भागात आपल्या पक्षाचे मतदानाचे दावे तपासत आहेत.